# हुतात्मा स्मारक मेट्रो स्थानक पूर्णत्वाकडे

## १०० वर्षे जुन्या इमारतींच्या सुरक्षिततेसह बोगद्याचे बांधकाम प्रगतिपथावर

मुंबई, ता. २ : भूमिगत मुंबई मेट्रो- ३चे काम प्रगतिपथावर आहे. या मार्गातील अनेक स्थानकांचे काम पूर्णत्वास जात आहे. त्यापैकीच दुसऱ्या टप्प्यातील हुतात्मा स्मारक चौक स्थानकाचेही काम प्रगतिपथावर असल्याची माहिती मुंबई मेट्रो प्रशासनाने दिली आहे.



**मुंबई** : हुतात्मा मेट्रो स्थानकासाठी बोगद्याचे काम सुरू आहे.

हुतात्मा स्मारक स्थानकांचे बांधकाम हे या मार्गातील सर्वाधिक आव्हानात्मक होते. कारण या भागात १०० वर्षे जुन्या ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या इमारती आहेत. बोगद्याचे खोदकाम करतेवेळी १० हजार छोटे ब्लास्ट करण्यात आले, ज्यामुळे या इमारतींना खोदकाम करताना कोणताही धोका निर्माण झाला नाही. या हेरिटेज इमारतीच्या खाली २५३ मीटरवर लांबीचा प्लॅटफॉर्म बोगदा आहे. यासाठीचे एकूण ८२ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यापैकी बोगद्याचे १०० टक्के काम, ८ क्रॉस पॅसेज जे दोन्ही प्लॅटफॉर्मला जोडतात, २४ तास ७ दिवस रिअल टाइम मॉनिटरिंगसह इन्स्ट्रुमेंटेशन, ९०.३ टक्के सिव्हिल वर्क, ५३.८ टक्के सिस्टिम वर्क पूर्ण झाले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने युद्धपातळीवर 'मेट्रो ३'चे काम हाती घेतले आहे. ३३.५ किमी लांबीची ही भूमिगत मेट्रो मार्गिका दोन टप्प्यात वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात बीकेसी ते आरेदरम्यान डिसेंबर २०२३ सेवेत आणण्याचा मुंबई मेट्रोचा प्रयत्न आहे.

### इमारतींवर नजर

हुतात्मा चौक स्थानक हे कट अँड कव्हर व न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग पद्धतीचा वापर करून बांधण्यात येत आहे. बांधकामादरम्यान हुतात्मा चौक नजीकच्या वारसा इमारतींना धोका पोहचू नये, यासाठी कॉर्पोरेशनद्वारे विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बांधकामादरम्यान इमारतीवर क्रॅक मीटर, पिझो मीटर, इंक्लीनो मीटर, टील्टो मीटर यासारखे अनेक उपकरणाद्वारे या इमारतीची देखरेख केली जाते. याशिवाय इमारतीचे २४ तास ऑनलाईन पद्धतीने देखरेख केली जाते.